NAVJYOT / Vol. IX / Issue – IV ISSN 2277-8063

# संत सावता माळी

**प्रा.डॉ. विवेक गं. देशमुख**, सहाय्यक प्राध्यापक, स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, वरुड, जि.अमरावती

संत साहित्यामध्ये संताचे योगदान लक्षणीय आहे. त्यातही मराठी साहित्याची उंची वाढविणारे आहे. आपल्या कर्तव्य कर्मावर निष्ठा ठेवणाऱ्या संत सावता माळी यांना महाराष्ट्राच्या संतांमध्ये महत्वाचे स्थान आहे. 'वारकरी संप्रदाय' म्हटला की, त्यांचे नाव प्रामुख्याने समोर येते. त्यांचा जन्म इ.स. १२५०मध्ये अरणभेंडी या गावी परसूबा आणि नांगिताबाई यांचे पोटी झाला तर विवाह भानवसे रुपमाळी यांची कन्या 'जनाबाई' हिचेशी झाला. संत सावतोबांना विठ्ठल नावाचा मुलगा तर नागाबाई नावाची मुलगी होती. त्यांचे संपूर्ण आयुष्य अरणभेंडी येथील शेतमळयात बागाईत करण्यातच गेले. त्यांना लाभलेल्या अवघ्या पंचेचाळीस वर्षाच्या आयुष्यामध्ये त्यांनी विठ्ठल नामसंकीर्तन करुन आपला शेतीचा व्यवसाय प्रामाणिकपणे केला व भक्तीचा मळा फुलविला, त्यातून त्यांच्या व्यक्तित्त्वात निष्काम कर्मयोग्याचे दर्शन घडते.

काशीबा गुरव नावचे गृहस्थ संत सावतोबांचे अभंग लिहून ठेवीत असे सदोतीस अभंग 'सकलसंतगाथेत' आढळून येतात. त्यात त्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. संत सावतोबांचे आईवडील विठ्ठलभक्त, आजोबाही विठ्ठलभक्त, पंढरीचे एकनिष्ठ वारकरी, तिसरी पिढी संत सावतोबांची. पुण्यवान आणि भाग्यवान असलेल्या तीन पिढया! हा लाभ क्वचितच एखाद्या घराण्याला लाभतो. त्याच परंपरेने कुळात चालत आलेल्या वारीचा ते गौरवाने उल्लेख करतांना दिसतात,

''पूर्वापार कुळी, पंढरीचा नेम ।<br>
मुखी सदा नाम विठ्ठलाचे ।।<br>
तारी अथवा मारी, देवा तूचि एक ।<br>
न घ्यावी भाक, पांडुरंगा ।।''

माळियाच्या जातीत जन्मला आलेले संत सावतोबा हे टाळकुटे संत नव्हते तर, प्रपंच करुन परमार्थ साधणारे संत होते. ऐहिक जीवनात कर्तव्यकर्म करीत असतांना ईश्वराची भक्ती करता येते आणि तो अधिकार सर्वांनाच असून कामातच राम असल्याचा उल्लेख त्यांच्या पुढील अभंगातून दिसून येतो.

''आमुची माळियाची जात । शेत लावू बागाईत ।<br>
आम्हा हाती मोट—नाडा । पाणी जाते फुलझाडा ।।<br>
शांती—शेवंती फुलली । प्रेम जाई—जुई व्याली, फुलली ।।<br>
सावताने केला मळा । विठ्ठल देखियला डोळां ।।<br>
स्वकर्मात व्हावे रत । मोक्ष मिळे हातोहात ।।''

अशा साध्या, सोप्या, वृत्तालंकाराचा सोस नसलेल्या भाषेतून त्यांचे अध्यात्माचे सुंदर व परमार्थ प्रेरणा देणारे विचार यादव काळात दिसतात, ही बाब मराठी साहित्याच्या संदर्भात विशेष महत्वाची असल्याचे दिसून येते.

परमेश्वराने 'हीन' जातीत जन्माला घातले याचे संत सावतोबांना थोडेही दु:ख वाटत नाही तर समाधान वाटते. कारण तथाकथित उच्चवर्णियांच्या कर्मकांडाच्या जंजाळात आम्ही अडकलो नाही, याबद्दल देवाचे उपकार मानतांना ते म्हणतात,

भली केली हीन याति । नाही वाढली महंती ।।<br>
जरी असता ब्राम्हण जन्म । तरी हे अंगी लागते कर्म ।।<br>
स्नान नाही संध्या नाही । याति कुळ संबंध नाही ।।<br>
सावता म्हणे हीन याती । कृपा करावी श्रीपती ।।

वारकरी संप्रदायातील संत ज्ञानदेव—संत नामदेव यासारख्या संतांनी नामस्मरणाचा अत्यंत सोपा मार्ग दाखविला, त्यामुळे अतिशय कठीण असणारा तापदायक उपासनामार्गाचा विचारच कशाला करायचा ? असे सांगून देवाविषयीची अढळ श्रध्दा व्यक्त करतात व त्याचीच करुणा भाकतांना म्हणतात,

''का गा रुसलाशी कृपाळू बा हरी । तुजविण दुसरी भक्ती नेणे ।।''

आपल्या व्यवसायातच विठ्ठल पाहण्याची वृत्ती अनेक संताच्या ठिकाणी दिसते, त्याप्रमाणेच संत सावतोबांचा 'कांदा मुळा भाजी' हा अभंग अप्रतिम असून त्यातील सांगरूपक विशेष लक्षणीय आहे. या ठिकाणी उपमेय आणि उपमान अलंकारातील एकवाक्यता सुध्दा पाहण्यासारखी आहे.

''कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।।<br>
लसूण, मिरची, कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।<br>
मोट, नाडा, विहीर, दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।<br>
सावता म्हणे केला मळा । विठ्ठला पायी गोविला गळा ।।''

येथे कांदा, मुळा, भाजी मध्ये विठाबाईचे रुप दिसते तर लसूण, मिरची, कोथिंबिरीत श्रीहरीचे रुप दिसते मोट, नाडा, विहीर, दोरी मळयामध्ये अवघी पंढरी व्यापलेली आहे. या ठिकाणी संत सावतोबांचा मळा साक्षात विठ्ठलभक्तीचा मळा दिसून येतो. आपला शेतीचा व्यवसाय सांभाळून त्यांनी भक्तीमार्ग चालू ठेवला. परंतु कोणत्याही कर्मकांडात ते अडकले नाही तर आपल्या कामातच ईश्वर असतो, आपण ते काम करतो ते

निष्ठापूर्वक करणे हीच खरी शक्ती आहे. ईश्वराचे अस्तित्व सर्व चराचरात आहे त्यांनी मानवाला सुखमय जीवन जगण्याचा संदेश दिला. यातिकुळ हे निरर्थक असून आपण शुध्द भक्तीभावाने आपले जीवन आंनदमय करु शकतो याचे मार्गदर्शनही त्यांनी केलेले आहे.

ज्ञानमार्ग व योगमार्गा पेक्षा भक्तीमार्ग ईश्वरप्राप्तीसाठी अत्यंत सोपा असल्याचे त्यांनी सांगितले. वेद, शास्त्रे आणि पुराणाचे वर्णन करतांना वाणी थकून गेली असा 'विठ्ठल' भीमेच्या तीरावर भक्त पुंडलिकाला भक्तीच्या योगाने सहज प्राप्त झाला.

''वेद श्रुती शास्त्रे पुराणे श्रमली
परी तया विठ्ठली गम्य नाही
ते या पुंडलिका सुलभ पै जाहले
उध्दारावया आले भीमातीरी''

संत सावतोबा पंढरपूरच्या वारीला कधी गेले नाही पण पंढरीचे पांडुरंग त्यांच्या भेटीला अरण येथे आले. त्यांनी पांडुरंगालाच गुरु मानले. संत नामदेवाला संत सावतोबांची थोरवी, ईश्वरभक्ती कळली म्हणूनच त्यांनी त्यांच्या विषयी गौरवोद्‌गार काढलेले आहे. ते म्हणतात,

''धन्य धन्य ते आरण रत्नाचिया खाण । जन्मला निधान सावता तो ।।
सावता सागर प्रेमाचा आगर । घेतला अवतार माळ्या घरी ।।
धन्य त्याची माता धन्य त्याचा पिता । साठविला दाता त्रैलोक्याचा ।।
नामा म्हणे त्याचा जन्म सुफल झाला । वंश उध्दारिला माळीयांचा ।।

महानभक्त प्रत्यक्ष देवापेक्षा थोर ठरतात. देव सुध्दा त्यांचा भक्त बनतो. देव आणि भक्त एकरुप होतात. संत सावतोबांच्या घरी देव राबले काम धंदा करु लागले. संत एकनाथांनी याचे सुंदर वर्णन पुढील प्रमाणे केले आहे.

माळीयाचे वंशी सावता जन्मला । पावन तो केला वंश त्याचा ।।
त्याजसवें हरी खुरपू लागे अंगे । धाऊनी त्याच्या मागे काम करी ।।
पीतांबर कास खोवोनी माघारी । सर्व काम करी निजसंगे ।।
एका जनार्दनी सावता तो धन्य । त्याचे महिमान न कळे काही ।।

संत एकनाथ व संत नामदेवांनी केलेल्या गौरवावरुन त्यांचे संत मंडळीत असलेले मानाचे स्थान दिसून येते. त्यांच्या एकूण जीवनकार्याचे सार अभ्यासकांनी पुढील शब्दात नोंदविले आहे. ''संत सावता महाराज हे वारकरी संप्रदायातील एक जेष्ठ संतकवी आहे. सकल संत गाथेतून त्यांचे केवळ सदोतीस अभंग आपल्या हाताशी येतात. पण अत्तराच्या एका कुपीत गुलाबांच्या अनेक फुलांचा अर्क साठवलेला असावा, तसे थोड्या अभंगातूनही सावता महाराजांच्या कवित्त्वाचे सौंदर्य जाणवते.'' अशा प्रकारे संत सावतोबांच्या अभंगातून प्रकट होणारी सामाजिक जाणीव व भक्तीची तीव्रता यांचेच मोल अधिक मानावे लागते. अशा सावतोबांचा कर्मठ विचारसरणीच्या लोकांनी खूप छळ केला, त्यांना मारहाणही केली, त्यांचा शेतमळाही पेटवून दिला हे सर्व आघात पचवून त्यांनी आषाढ वद्य चतुर्दशी शके—१२१७, इ.स. १२९५ मध्ये 'अरण' या जन्मगावी संजीवन समाधी घेतली.

**संदर्भ :**

१. पठाण यू.म., महाराष्ट्राची संत परंपरा, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१२
२. माळी ग.द., सावताने केला मळा, सुनील प्रकाशन, धुळे, १९७३
३. भगत रा.तु., संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मूलन, रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, २०११
४. इनामदार हे.वि., अभंग नवनीत अवधूत प्रकाशन, कोल्हापूर, १९९६
५. चौधरी कृष्णा, महात्मा जोतीराव फुले पूर्वसूरी आणि प्रभावळ, ऋचा प्रकाशन, नागपूर, २००५